Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ८, अंक ३३] गुरूवार, ऑक्टोबर ६, २०२२/आश्विन १४, शके १९४४ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ६२.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु) म. शा. रा., अ, क्र. ५१५.

**मुख्याधिकारी, नगर परिषद, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) अन्वये मोर्शी शहराच्या मूळ हद्दीच्या प्रारुप विकास योजनेचे (पहिली सुधारित) प्रसिध्दीकरण**

**सूचना**

क्रमांक ९७६-२०२२.—

ज्याअर्थी, मोर्शी नगर परिषदेने (यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असे निर्देशिलेले), तिच्या अधिपत्याखालील क्षेत्राची (यापुढे "उक्त क्षेत्र" असे उल्लेखलेली), महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त अधिनियम" असे निर्देशिलेली) चे कलम २१(२) चे अनुषंगाने कलम २३(१) मधील तरतुदीनुसार प्रारुप विकास योजना (पहिली सुधारित), मोर्शी मूळ हद्द (यापुढे "उक्त प्रारूप विकास योजना" असे उल्लेखलेली) तयार करण्याचा इरादा ठराव क्र. ८८, दिनांक ३० मार्च २०२१ अन्वये जाहीर करुन त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक-अ अमरावती विभागीय पुरवणी मध्ये दिनांक ऑगस्ट, १२ ते १८ (गुरूवार ते बुधवार) वर्ष ७, अंक २५ प्रसिध्दी देण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २४ च्या तरतुदीस अनुसरून मोर्शी नगर परिषद उक्त क्षेत्रासाठी उक्त प्रारूप विकास योजना तयार करण्यासाठी सहायक संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग, शाखा अमरावती यांची "नगर रचना अधिकारी" म्हणून आदेश क्रमांक नपामो-जाक्र.-नर-७९८-२०२१, दिनांक ३० ऑगस्ट २०२१ अन्वये नेमणूक केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार, नगर रचना अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग, शाखा अमरावती यांनी, उक्त अधिनियमाचे कलम २५ अन्वये विद्यमान जमीन वापर नकाशा तयार केल्यानंतर, उक्त क्षेत्राची उक्त प्रारूप विकास योजना तयार करुन ती उक्त नियोजन प्राधिकरणाकडे उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये प्रसिध्द करण्यासाठी हस्तांतरीत केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये उक्त प्रारूप विकास योजनेत जनतेकडून सूचना/हरकती मागविण्याकरिता प्रसिध्द करण्यासाठी मा. प्रशासक, नगर परिषद, मोर्शी यांचे आदेश क्र. १, दिनांक ४ ऑक्टोबर २०२२ अन्वये आदेश पारित केलेला आहे.

त्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरण, उक्त प्रारूप विकास योजना (पहिली सुधारित), विकास योजना अहवालासह उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये नागरिकांकडून सूचना/हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द करीत आहे. सदरहू योजनेसंबंधीचे नकाशे व अहवाल कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ, खाली नमूद केलेल्या कार्यालयात उपलब्ध आहेत.

१. मुख्याधिकारी, नगर परिषद, मोर्शी, जिल्हा अमरावती.

२. सहायक संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग, शाखा अमरावती.

उक्त प्रारूप योजनेतील तरतुदीसंबंधी नागरिकांच्या काही सूचना/हरकती असतील तर त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत मुख्याधिकारी, नगर परिषद, मोर्शी, जिल्हा अमरावती यांचेकडे लेखी स्वरुपात कारणांसह पाठवाव्यात. सदरची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत नगर परिषदेकडे प्राप्त झालेल्या सूचना/हरकती विचारात घेतल्या जातील.

उक्त प्रारुप विकास योजनेचे नकाशे व तपशीलच्या प्रती योग्य शुल्क आकारून नगर परिषद, मोर्शी कर्यालयात नागरिकांना उपलब्ध होऊ शकतील.

**रविंद्र पाटील,**
मुख्याधिकारी,
नगर परिषद, मोर्शी.

मोर्शी :
दिनांक ४ ऑक्टोबर २०२२.

---

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५१६.

BY CHIEF OFFICER, MUNICIPAL COUNCIL

**PUBLICATION OF DRAFT DEVELOPMENT PLAN (FIRST REVISION) OF MORSHI UNDER SECTION 26*(1)* OF MAHARASHTRA REGIONAL & TOWN PLANNING ACT, 1966.**

*NOTICE*

No. 976-2022—

Whereas, the Morshi Municipal Council (hereinafter referred to as “the said Planning Authority,”) *vide* Resolution No. 88, dated 30th March, 2021, had declared its intention to prepare a Draft Development Plan (First Revision) of Morshi City (hereinafter referred to as the “said Draft Development Plan”) for the area under its jurisdiction, (hereinafter referred to as the said “area”) as per the provision of Section 23*(1)* read with Section 21*(2)* of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as the “said Act”) and notice to that effect is published in Maharashtra Government Gazette Amravati Division Supplement Part 1-A, Dated August 12th to 18th, 2021 (Thursday to Wednesday), Year 7, 25th Publication.

And whereas, as per the provesion in Section 24 of the said Act, the Municipal Council, Morshi by *vide* No.-NapaMo-Outward-TP-798-2021, dated 30th August 2021 has appointed Assistant Director, Town Planning And Valuation Department, Amravati Branch as “Town Planning Officer” to prepare the said Draft Development Plan for the said area.

And whereas, the Town Planning Officer and Assistant Director, Town Planning and Valuation Department, Amravati Branch after having prepared Existing Land use Map as per Section 25 of the said Act, has prepared the said Draft Development Plan (First Revision) of the said area and has handed it over to the said Planning Authority on 3rd October 2022 for publication under Section 26(*1*) of the said Act.

And whereas, the Administrator of said Municipal Council, Morshi has passed Order No. 1, dated 4th October 2022 to publish the said Draft Development Plan (First Revision) under Section 26(*1*) of the said Act, for inviting suggestions/objections from the public.

Therefore, Municipal Council, Morshi hereby publishes the said Draft Development Plan (First Revision) along with the Report under Section 26(*1*) of the said Act for inviting suggestions/objections from the public. The copy of the said Draft Development Plan and Report thereof are kept open for inspection of the public at the following offices on all working days during office hours.

1. Chief Officer, Municipal Council, Morshi.
2. Assistant Director, Town Planning and Valuation Department, Amravati Branch.

The suggestions/objections if any, in writing from the public in this regard with reasons, shall be submitted to the Chief Officer, Municipal Council, Morshi, within the period of 30 days from the date of publication of the Notice in *Maharashtra Government Gazette.* Suggestions/objections received by the Municipal Council, Morshi within the period of the 30 days from the date of publication of this Notice in *Maharashtra Government Gazette* shall only be considered. The copies of the said Draft Development Plan and particulars shall be available to the public at reasonable price in the office of the Municipal Council, Morshi.

RAVINDRA PATIL,
Chief Officer,
Municipal Council, Morshi.

Morshi :
Dated the 4th October 2022.

---

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५१७.

**मुख्याधिकारी, नगर पंचायत, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) अन्वये मानोरा शहराच्या प्रारूप विकास योजनेचे प्रसिद्धीकरण.**

**सूचना**

क्रमांक ५३२-२०२२.—

ज्याअर्थी, मानोरा नगर परिषदेने/नगर पंचायतीने (यापुढे " उक्त नियोजन प्राधिकरण " असे निर्देशिलेले) तिच्या अधिपत्याखालील क्षेत्राची (यापुढे " उक्त क्षेत्र " असे उल्लेखलेली), महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६, (यापुढे " उक्त अधिनियम " असे निर्देशिलेली) चे कलम २१(२) चे अनुषंगाने कलम २३(१) मधील तरतुदीनुसार प्रारूप विकास योजना मानोरा (यापुढे " उक्त प्रारूप विकास योजना " असे उल्लेखलेली) तयार करण्याचा इरादा ठराव क्रमांक १, दिनांक १८ मार्च, २०२१ अन्वये जाहिर करून त्याबाबतीत सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, पुरवणी भाग १-अ, मध्ये दिनांक १ एप्रिल, २०२१-०७ एप्रिल, २०२१ रोजी पान क्रमांक ०७ वर अमरावती विभाग मध्ये प्रसिद्ध केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २४ च्या तरतुदीस अनुसरून मानोरा नगर परिषद/नगर पंचायत उक्त क्षेत्रातील उक्त प्रारूप विकास योजना तयार करण्यासाठी सहायक संचालक, नगर रचना, नगर रचनाकार, वाशिम शाखा, जिल्हा वाशिम यांची " नगर रचना अधिकारी " म्हणून आदेश क्रमांक ५८०, दिनांक २५ मार्च, २०२२ अन्वये नेमणूक केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार, नगर रचना अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना/नगर रचनाकार, वाशिम शाखा, वाशिम यांची उक्त अधिनियमाचे कलम २५ अन्वये विद्यमान जमीन वापर नकाश तयार केल्यानंतर उक्त क्षेत्राची उक्त प्रारूप विकास योजना तयार करून ती उक्त नियोजन प्राधिकरणाकडे उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये प्रसिद्ध करण्यासाठी हस्तांतरीत केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये उक्त प्रारूप विकास योजना जनतेकडून सूचना/हरकती मागविण्याकरीता प्रसिद्ध करण्यासाठी ठराव क्रमांक १, दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२२ रोजी पारित केलेला आहे.

त्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरण उक्त प्रारूप विकास योजना, विकास योजना अहवालासह उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये नागरिकांकडून सूचना/हरकती मागविण्यासाठी प्रसिद्धी करत आहे. सदरहू योजने संबंधीचे नकाशे व अहवाल कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ, खाली नमूद केलेल्या कार्यालयात उपलब्ध आहेत.

१. मुख्याधिकारी, मानोरा नगर परिषद/नगर पंचायत, मानोरा.

२. सहायक संचालक, नगर रचना/नगर रचनाकार, वाशिम शाखा, वाशिम.

उक्त प्रारूप योजनेतील तरतुदीसंबंधी नागरिकांच्या काही सूचना/हरकती असतील तर त्यांनी हि सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत मुख्याधिकारी, मानोरा, नगर पंचायत यांचेकडे लेखी स्वरूपात कारणांसह पाठवाव्यात. सदरची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत नगर पंचायत यांचेकडे प्राप्त झालेल्या सूचना/हरकती विचारात घेतल्या जातील.

उक्त प्रारूप विकास योजनेचे नकाशे व तपशीलाच्या प्रती योग्य शुल्क आकारून मानोरा नगर पंचायतीच्या कार्यालयात नागरिकांना उपलब्ध होऊ शकतात.

**प्रणय तांबे,**
मुख्याधिकारी,
नगर पंचायत, मानोरा.

मानोरा :
दिनांक ३ ऑक्टोबर २०२२.

---

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५१८.

BY CHIEF OFFICER, NAGAR PANCHAYAT

**PUBLICATION OF DRAFT DEVELOPMENT PLAN OF MANORA UNDER SECTION 26*(1)* OF MAHARASHTRA REGIONAL & TOWN PLANNING ACT, 1966.**

*NOTICE*

No. 532-2022—

Whereas, the Manora Nagar Panchayat, (hereinafter referred to as the said “Planning Authority”) *vide* Resolution No. 835, dated 30th September, 2022 had declared its intention to prepare a Draft Development Plan of Manora (hereinafter referred to as the “said Draft Development Plan ”) for the area under its jurisdication, (hereinafter referred to as the “ Äreа ”) as per the provision of Section 23(*1)* read with Section 21(*2*) of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as the “ Act ”) and notice to that effect is published in Maharashtra Government Gazette Amravati Division Supplement Part-1-A, from dated 1$^{st}$ April, 2021 to 7$^{th}$ April, 2021 on Amravati Region.

And whereas, as per the provesion in Section 24 of the said Act, the Nagar Panchayat *vide* Order No. 580, dated the 25$^{th}$ March 2022 has appointed Assistant Directors, Town Planning, Washim Branch, Washim as Town Planning Officer to prepare the said Draft Development Plan for the said area.

And whereas, the Town Planning Officer and Assistant Director, Town Planning/Town Planner, Washim Branch, Washim after having prepared Existing Land use Map as per Section 25 of the said Act, has prepared the said Draft Development Plan of the said area and has handed its over to the said Planning Authority on Washim for publication under Section 26(*1*) of the said Act.

And whereas, the said Planning Authority has passed Resolution No. 1, dated 3$^{rd}$ October 2022 to publish the said Draft Development Plan under Section 26(*1*) of the said Act, for inviting suggestions/ objections from the public.

Therefore, Manora, Nagar Panchyat hereby published the said Draft Development Plan along with the Report under Section 26(*1*) of the said Act for inviting suggestions/objections from the public. The copy of the said Draft Development Plan and Report thereof are kept open for inspection of the public at the following offices on all working days during office hours.

1. Chief Officer, Manora, Nagar Panchayat.
2. Assistant Director, Town Planning/Town Planner, Washim Branch, Washim.

The suggestions/objections if any, in writing from the public in this regard with reasons, shall be submitted to the Chief Officer, Manora, Nagar Panchayat within the period of 30 days from the date of publication of the Notice in *Maharashtra Government Gazette.* Suggestions/objections received by the Manora, Nagar Panchayat within the period of the 30 days from the date of publication of this Notice in *Maharashtra Government Gazette* shall only be considered.

The copies of the said Draft Development Plan and particulars shall be available to the public at reasonable price in the office of the Manora, Nagar Panchayat.

PRANAY TAMBE,

Manora : Chief Officer,

Dated the 3rd October, 2022. Nagar Panchayat, Manora.

अ.-एक-अ-२ (१७२२).

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.